<u>नि. फौ. ख. क्र. १६७/२०१८ मधील नि. क्र. ७९ वरील</u>

<u>हुकुम</u>

<u>(सी.एन.आर.नं.:– MHK0110014922018)</u>
<u>दिनांक ०२/०२/२०२२</u>

१. अर्ज वाचला, सरकारी वकील यांनी दिलेले म्हणणे वाचले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले, संबंधीत पक्षकारचा युक्तिवाद ऐकला.

२. आरोपी क्र. ४ यांचे नमुद गन्ह्याकामी त्यांचे सांगली जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि., शाखा ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जिल्हा – सांगली येथील बचत खाते क्र. ०३५०५११०००७३१० असून सदर खातेवर रक्कम ₹१,५२,३६८.७५ शिल्लक असलेली रक्कम यापूर्वी दिनांक १३/०३/२०२० रोजी आदा करण्यात आलेली आहे. त्यानंतर सदर खातेवर अर्जदार यांचे नांवे प्रधानमंत्री किसान योजनेनुसार रक्कम ₹१२,०००/– जमा झाली आहे. तसेच महात्मा फुले कर्ज माफीची रक्कम ₹११,२०५/– ही देखील जमा झालेली आहे. यशिवाय तहसिलदार इस्लामपूर यांचेमार्फत अर्जदार यांचे घर पावसाळ्यामध्ये बुडीत झालेने ती रक्कम ₹७,५६०/– जमा झाली आहे. त्याचबरोबर सदर रकमेवर ₹१,६५२/– व्याज अशी एकुण होणारी रक्कम ₹३२,४१७/– जमा असलेबाबत कथन केलेले आहे. सदर खातेवरील शिल्लक रक्कम अर्जदार यांचीच आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सदर रकमेची मागणी केली आहे.

३. सरकारी वकीलांनी वर नमुद खातेवरील किसान योजनेमार्फत जमा आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जावर योगयते आदेश करण्यात यावेत.

४. प्रस्तुत खटल्याचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याकामी पोलीसांतर्फे तपास पुर्ण होवून आरोपी क्र. १ ते ७ यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दिनांक १२/११/२०१८ रोजी भारतीय दंड संहिता कलम १८६० चे कलम

४०६, ४१६, ४२०, ४६७, ४६८, ४७२ सह ३४ अन्वये न्यायालयात दाखल झालेले आहे. सदर गुन्ह्यातील तपासादरम्यान आरोपी क्र. ४ यांचे नमुद सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा ऐतवडे खुर्द, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ७३१० हे सिल करण्यात आले होते. अभियोग पक्षाने सदरचे खाते हे आरोपी क्र. ४ चे आहे याबद्दल कोणताही आक्षेप घेतलेला नाही. सरकारी वकीलांच्या कथनाप्रमाणे आरोपी क्र. ४ याने दिनांक ०९/०७/२०१८, ०१/०८/२०१८, १३/०८/२०१८ रोजी सदर खातेवर अनुक्रमे रक्कम ₹९०,०००/-, ₹५०,०००/-, ₹३०,०००/- जमा केली होती व सदरची रक्कम ही यापूर्वी दिनांक १३/०३/२०२० रोजी आरोपी क्र. ४ यांना देण्यात आलेली आहे. त्यानंतर सदर खातेवर अर्जदार यांचे नांवे प्रधानमंत्री किसान योजनेनुसार रक्कम ₹१२,०००/- जमा झाली आहे. तसेच महात्मा फुले कर्ज माफीची रक्कम ₹११,२०५/- ही देखील जमा झालेली आहे. यशिवाय तहसिलदार इस्लामपूर यांचेमार्फत अर्जदार यांचे घर पावसाळयामध्ये बुडीत झालेने ती रक्कम ₹७,५६०/- जमा झाली आहे. त्याचबरोबर सदर रकमेवर ₹१,६५२/- व्याज अशी एकुण होणारी रक्कम ₹३२,४१७/- जमा आहे. सदरची जमा रक्कम आरोपी क्र. ४ मागणी करत आहेत. तरी प्रस्तुत गन्ह्याचे स्वरूप पाहता व आरोपी क्र. ४ यांची विनंती पाहता आरोपी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज निशाणी क्र. ७९ मंजूर करण्यात येतो.

२. नियमित फौजदारी खटला क्र. १६७/२०१८ मध्ये जप्त करण्यात आलेले आरोपी क्र. ४ चे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा ऐतवडे खुर्द, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ०३५०५११०००७३१० खातेवरील प्रधानमंत्री

किसान योजनेनुसार जमा रक्कम ₹१२,०००/-, महात्मा फुले कर्ज माफीची जमा रक्कम ₹११,२०५/-, तहसिलदार इस्लामपूर यांचेमार्फत अर्जदार यांचे घर पावसाळ्यामध्ये बुडीत झालेने जमा केलेली रक्कम ₹७,५६०/- व सदर रकमेवर ₹१,६५२/- व्याज अशी एकुण होणारी रक्कम **₹३२,४१७/- (बत्तीस हजार चारशे सतरा फक्त** ) आरोपी क्र. ४ यांना देण्यात यावी.

**३.** आरोपी क्र. ४ यांचे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा ऐतवडे खुर्द, जि. कोल्हापूर येथील बचत खाते क्र. ०३५०५११०००७३१० मधील बचत खाते जप्तीचा आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE Date: 2022.02.02 16:54:17 +0530

**दिनांक ०२/०२/२०२२.** **( सी. एस. देशपांडे )**
**पेठ–वडगांव.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ–वडगांव.**